न. कौन्सिल सभा क्र.१ कौ.ठ.नं.७

सर्वसाधारण सभा दि.२४/५/२०१६

विषय क्र.७:इचलकरंजी शहर होर्डीग फ्री करणेबाबत शहर विकास आघाडी,इचलकरंजी नगरपरिषद यांनी दि.९/५/२०१६ चे पत्रानुसार मागणी केलेकामी कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

:: ठराव ::

इचलकरंजी शहर होर्डीग फ्री करणेबाबत शहर विकास आघाडी,इचलकरंजी नगरपरिषद यांनी दि.९/५/२०१६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

याबाबत कार्यालयाने मा.ना.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१५५/२०११ आणि संबंधित इतर जनहित याचिकांमध्ये दि.३/६/२०१४ रोजी दिलेल्या आदेशांचे उल्लंघन होत असलेने शहर विकास आघाडीने दिलेल्या निवेदनाचे अनुषंगाने संपूर्ण शहर होर्डीगमुक्त करणेबाबतचा मे.कौन्सिलमध्ये धोरणात्मक निर्णय होणेसाठी प्रस्ताव सादर केला असून कार्यालयीन प्रस्ताव वाचणेत आला.

तरी शहरात सद्या असणा-या जाहीरात बोर्ड व होर्डीगमुळे शहराचे विद्रुपीकरण झालेले असलेने शहरातील सर्व होर्डीग काढणेत यावेत यापूर्वी परवानगी देणेत आलेले सर्वच जाहीरात बोर्डांची परवानगी रद्द करणेत येत असून रोड डिव्हायडरवर लावणेत आलेले जाहीरात बोर्डही काढणेत यावेत फक्त शहरातील प्रमुख चौकातील नगरपरिषदे मार्फर शासकीय जाहीराती, नगरपरिषदे मार्फत नागरिकांना करणेत येणारे जाहीर आवाहन, सूचना याबाबतचे जाहीरात फलक लावणेत यावेत.

शहरात अन्यत्र स्वतःचे मालकीचे जागेत जाहीरात करणेचे झालेस नगरपरिषदेकडून परवानगी घेणे बंधनकारक राहील सदर बोर्डाबाबत वाद निर्माण झालेस त्याची संपूर्ण जबाबदारी जागा मालकांवर राहील तसेच बिगरपरवाना जाहीरात केलेस जाहीरात बोर्डधारक व जागामालक या दोघांवर फौजदारी कारवाई करणेत यावी.

सूचक : दि. गो. सोळ.

अनुमोदक : प्र. भि. पाटील.

ठराव सर्वानुमते मंजूर.

अध्यक्ष

इचलकरंजी नगरपरिषद.

अधिनियमातील तरतुदीनुसार ठराव योग्यतेची खात्री करुन पुढील कार्यवाही प्रस्तावीत करावी

मुख्याधिकारी

इचलकरंजी नगरपरिषद

सत्यप्रत मान्य

सेक्रेटरी,

इचलकरंजी नगरपरिषद.